पुढारी

संक्षिप्त

## व्हॉट नाऊ, महाराष्ट्र सायबर यांच्यात करार

**मुंबई :** सायबर गुन्हे, सायबर छळ, सेक्सटॉर्शन तसेच सर्व प्रकारच्या ऑनलाइन गैरवर्तनाविरोधात कार्य करणारी अग्रगण्य स्वयंसेवी संस्था व राष्ट्रीय जनजागृती चळवळ 'व्हॉट नाऊ' हिने महाराष्ट्र सायबरसोबत एक ऐतिहासिक सामंजस्य करार केला आहे. या कराराच्या स्वाक्षरी समारंभाला यशस्वी यादव,अतिरिक्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र सायबर, महाराष्ट्र शासन, यांची उपस्थिती होती. 'व्हॉट नाऊ'च्या दृष्टीकोनाबाबत बोलताना नीती गोयल म्हणाल्या, ऑनलाइन गैरवर्तनाच्या पीडितांचा आवाज बळकट करणे आणि त्यांना पाठिंबा देणे यासाठी 'व्हॉट नाऊ'ची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र सायबरसोबतचे हे सहकार्य आमचा प्रभाव वाढवण्यास आणि शिक्षण व जनजागृतीद्वारे प्रत्यक्ष, तळागाळात परिणाम साधण्यास मदत करेल. डॉ. निवेदिता श्रेयांस म्हणाल्या, सायबर धोक्यांविरोधात जनजागृती आणि शिक्षण हेच सर्वात प्रभावी संरक्षण आहे. या भागीदारीद्वारे युवक आणि संवेदनशील समुदायांना डिजिटल जगात सुरक्षित व जबाबदारीने वावरण्यासाठी आवश्यक ज्ञान देण्याचा आमचा प्रयत्न आहे.